**राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम.**
**सह संचालक, आरोग्य सेवा**
**(हिवताप,हत्तीरोग व जलजन्य रोग) पुणे**

| | | |
|---|---|---|
| दुरध्वनी क्रमांक कार्यालय | २६६८३९२२ | कार्यालय सहसंचालक, आरोग्य सेवा( हिवताप, हत्तीरोग व जलजन्य रोग) आरोग्य भवन, विश्रांतवाडी पोलिस स्टेशन समोर, येरवडा, |
| राज्य आरोग्य सोसायटी | २६६८३५५० | |
| सह संचालक (वैयक्तिक) | २६६८४८९३ | |
| प्रकल्प संचालक (वैयक्तिक) | २६६८३६८८ | पुणे - ४११ ००६, |
| सहा.संचालक (ह) (वैयक्तिक) | २६६८५४६८ | फॅक्स नं.२६६८३६५१. |
| राज्य किटकशास्त्रज्ञ (वैयक्तिक) | २६६८५७८७ | ई-मेल नं. jdhsh@rediffmail.com |
| मुख्य प्रशासकीय अधिकारी (वै) | २६६१२१७८ | |

**आरोग्य सेवा**

जा.क्र.ससंआसे/साथरोग/कक्ष ५८/स्वा.फल्यू प्रतिबंध व नियंत्रण/ 2922-2223 /१६ दिनांक :-१५/०१/२०१६

प्रति,

उपसंचालक, आरोग्य सेवा,
आरोग्य मंडळे.........(सर्व)

**विषय :- फल्यू सदृश्य आजाराचे नियमित सर्वेक्षण करुन आवश्यक प्रतिबंध व नियंत्रणात्मक उपाययोजना राबविण्याबाबत.**

संदर्भ:- स्वाईन फल्यू २०१५ मधील माहेवार रुग्ण व मृत्यूंचा तपशील.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सन २०१५ मध्ये राज्यात स्वाईन फल्यूचे रुग्ण मोठया प्रमाणावर आढळून आले आहेत. या रुग्ण व मृत्यूंचा माहेवार विश्लेषणात्मक तपशील पाहताना मागील वर्षी जानेवारी महिन्याच्या तिसऱ्या आठवडयापासून रुग्णांचा चढता आलेख दिसून येतो. तसेच २००९ पासून स्वाईन फल्यू चा आढावा घेतला असता राज्यात दरवर्षी हिवाळयात तसेच पावसाळयात फल्यूचे रुग्ण अधिक संख्येने आढळत असल्याचे दिसून येते.

या पार्श्वभूमीवर आपण सर्वांनी आपल्या कार्यक्षेत्रात फल्यू सदृश्य आजाराचे सर्वेक्षण अधिक बळकट करुन त्या अनुषंगाने फल्यू प्रतिबंध व नियंत्रण प्रभावी उपाययोजना अमलात आणण्याची गरज आहे.

यादृष्टीने आपण सर्वांनी खालील उपाययोजना आपापल्या कार्यक्षेत्रात कार्यक्षमपणे अमलात येतील याची खातरजमा करावी.

१) फल्यू सदृश्य आजाराचे नियमित सर्वेक्षण - या करीता सर्व आरोग्य कर्मचारी आणि डॉक्टरांना आढावा बैठकीमध्ये फल्यू सदृश्य आजाराची व्याख्या व तिच्या सर्वेक्षणाचे महत्व विशद करावे. ज्या विभागातून फल्यू सदृश्य आजाराचे रुग्ण अधिक संख्येने आढळून येतील तिथे शीघ्र प्रतिसाद पथकाने भेट द्यावी.

२) फल्यू सदृश्य रुग्णांना वर्गीकरणाप्रमाणे उपचार - फल्यू सदृश्य रुग्णांना अ, ब व क वर्गीकरणानुसार तातडीने उपचार देण्यात यावेत. या वर्गीकरण तक्त्याची पोस्टर्स, आरोग्य शिक्षण साहित्य प्रत्येक आरोग्य संस्थेच्या बाहय रुग्ण विभागात लावावे. असे तक्ते खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांनाही उपलब्ध करुन द्यावेत.

३) भरती फल्यू रुग्णांची प्रयोगशाळा तपासणी.

४) ऑसेलटॅमीवीरचा पुरेसा साठा.

५) एक्स शेडयूल धारक खाजगी औषध दुकानांमध्ये ऑसेलटॅमीवीर उपलब्ध राहील याची खातरजमा करावी. याकरीता अन्न व औषध प्रशासनाशी नियमित समन्वय ठेवावा. अशा दुकानांची नावे जनतेसाठी जाहीर करावीत.

६) आपल्या कार्यक्षेत्रातील विलगीकरण कक्ष मार्गदर्शक सुचनांनूसार कार्यरत रहातील याची दक्षता घ्यावी. या कक्षात आवश्यकतेनूसार व्हेंटीलेटर व इतर उपकरणे कार्यरत अवस्थेत उपलब्ध राहतील याची खात्री वेळोवेळी करावी. विलगीकरण कक्षात कार्यरत डॉक्टरांना व्हेंटीलेटर व्यवस्थापनाचे प्रशिक्षण वेळोवेळी दिले जावे.

७) शासकीय तसेच खाजगी डॉक्टरांसाठी स्वाईन फल्यू विषयक कार्याशाळांचे आयोजन केले जावे.

८) फल्यू सर्वेक्षण, रुग्ण व्यवस्थापन यासाठी खाजगी वैद्यकीय क्षेत्राशी, महानगरपालिकांशी नियमित समन्वय ठेवावा.

९) फल्यू प्रतिबंधात्मक लसीकरण - आपल्या कार्याक्षेत्रातील प्रत्येक तालूकास्तरावर फल्यू प्रतिबंधात्मक लसीकरण केंद्र कार्यरत ठेवावे. या लसीकरणाचा उत्तम प्रचार करावा आणि अधिकाधिक अतिजोखमीच्या व्यक्तींनी ही लस घ्यावी याकरीता त्यांना प्रवृत्त करावे.

१०) आरोग्य शिक्षण - फल्यू कसा टाळावा तसेच फल्यू झाल्यास कशी काळजी घ्यावी या संदर्भातील महत्वाच्या बाबी जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत. आपल्या भागातील लसीकरण केंद्रे, ऑसेलटॅमीवीर उपलब्ध असणारी औषध दुकाने यांचीही योग्य ती प्रसिध्दी करावी.

वरील प्रकारे आपण स्वाईन फल्यू प्रतिबंध व नियंत्रणासाठी आपापल्या कार्यक्षेत्रात प्रभावी उपाययोजना कराव्यात. आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल वेळोवेळी या कार्यालयास सादर करावा.

सहसंचालक, आरोग्य सेवा,
(हिवताप, हत्तीरोग व जलजन्यरोग) पुणे

प्रत कार्यवाहीस्तव :-
१) जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय ............(सर्व)
२) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, .........(सर्व)
३) आरोग्य अधिकारी, म.न.पा........................(सर्व)

प्रत माहितीस्तव सविनय सादर :-
मा.संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय,मुंबई